# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १०–२०१०/ दिनांक :

श्री. गेनू मारुती चांभार ,
रा. मुचंडी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. गेनू मारुती चांभार, रा. मुचंडी, ता. जत, जि. सांगली यांनी वितरण कंपनीकडे आपल्या शेतीपंपासाठी नवीन विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. २२.११.२००९ अर्ज रोजी केला. वि.प.ने त्यांना दि. ८.१.२०१० पर्यंत चलन दिले नाही असे प्रस्तुतच्या तक्रारीत म्हटले आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १०.१२.२००९ रोजी रितसर तक्रार दाखल केली. कक्षाने दि. १६.१२.२००९ रोजी आदेश पारित केले. प्रस्तुतच्या तक्रारीद्वारे मंचाकडून विलंबापोटी भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे. तसेच दरीकोन्नूर शाखेमध्ये अनेक अर्ज प्रलंबित राहतात या बाबत मंचाने वितरण कंपनीस कडक सूचना द्याव्यात अशीही विनंती केली आहे.

वि.प.ने आपल्या दि. २०.२.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांस दि. ९.२.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे व ०.४२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम करावे लागते असे म्हटले आहे.

सदरची तक्रार मंचासमोर दि. ९.३.२०१० रोजी सुनावणीस घेतली असता, तक्रारदार गैरहजर. प्रतिनिधी दिलेले नाहीत. श्री. ए.के. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग व श्री. राजमाने, कनिष्ठ अभियंता, जत उप विभाग उपस्थित. वि.प.च्या अधिकाऱ्यानी तक्रारदाराचा २२.११.२००९ ला अर्ज आल्याचे व विलंब झाल्याचे मान्य केले आहे. ०.४२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे. तक्रारदाराचा तक्रार मागे घेत असल्याबाबतचा अर्ज दि. २२.३.२०१० ला हजर करणार असल्याचे वि.प.तर्फे सांगण्यात आले, परंतु अद्यापपर्यंत तक्रारदाराचे तक्रार मागे घेत असल्याबाबतचे पत्र मंचात प्राप्त झाले नाही.

उभयबाजूंच्या कथनानुसार अंतर्गत कक्षाने जरी दि. १६.१२.२००९ रोजी आदेश पारित केले तरी वि.प.ने चलन देणेस ९.२.२०१० पर्यंत विलंब लावला आहे व त्याबद्दल कुठलेही स्पष्टीकरण दिलेले नाही. ०.४२ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम हे कांही विलंबाचे कारण होवू शकत नाही, ती वेगळी बाब आहे. त्यामुळे वि.प.च्या संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे चलन देण्यास उशीर झाला आहे. पर्यायाने वि.प. आपल्या कर्तव्यात, कृती मानके विनियमातील तरतुदीची पूर्तता करण्यात अपयशी ठरली आहे त्यामुळे तक्रारदार यांस भरपाई देणेस जबाबदार आहे. त्यामुळे चलन देण्यास दि. २१.१२.२००९ ते ९.२.२०१० या ७ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ७००/– नुकसान भरपाई देणेस वि.प. जबाबदार आहे व तक्रारदार ती मिळण्यास हक्कदार आहे. खालील प्रमाणे आदेश –

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने मंच कार्यान्वित नसल्याने १०० पेक्षा अधिक प्रकरणांची सुनावणी व निर्णय प्रलंबित राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५, क्र. ५:१ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीत निर्णय करणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांस दि. २१.१२.२००९ ते ९.२.२०१० या ७ आठवडे विलंबाच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. ७००/– भरपाई द्यावी.

३) सदर रकमेचे बिलातून समायोजन करण्यात यावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ६.४.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :